# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -४२५** — **विषय क्रमांक – ४२५**

**दिनांक- २६/०९/२०२३** — **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४२५**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेत्रिय/२१३/२०२३ दि.२३/०८/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२१४३ दि.२३/८/२०२३ अन्वये, सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकामध्ये अ क्षेत्रीय कार्यालयाकडील आवश्यक कामा करीता वाढ घट करून तरतूद वर्गीकरण करणेबाबत. |
| **ठराव क्र. ४२५**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेत्रिय/२१३/२०२३ दि.२३/०८/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२१४३ दि.२३/८/२०२३ अन्वये, सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात तरतुद कमी असलेल्या खालील काम हे स्थापत्य विभागाशी संबंधीत असलेने व सदर कामाकरीता तरतुद उपलब्ध करून देणेस मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. तरी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात खालील प्रमाणे वाढ/घट करून तरतूद वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत खालीलप्रमाणे मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अनु. क्र. | कामाचे नाव | बजेट कोड | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | | उपलब्ध तरतूद २०२३-२४ | सन २०२३-२४ करीता तरतूद वर्गीकरण करावयाची | | सुधारित तरतूद २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पानांक | अ.क्र. | | वाढ | घट | |
| १ | एम्पायर इस्टेट उड्डाणपुलास चिंचवड बाजूकडे उतरणेस व चढणेस लूप/रॅम्प बांधणे-उड्डाणपुलाच्या कामात अडथळा ठरणारी Overhead Electric Line स्थलांतरित करणे. | **232403260** | स्थापत्य अंतर्गत विद्युत विषयक कामे. | ४७४ | १४५ | १००० | ५८९९००० | ० | ५९००००० |
| २ | एम्पायर इस्टेट उड्डाणपुलास चिंचवड बाजूकडे उतरणेस व चढणेस लूप/रॅम्प बांधणे. | **222300015** | 'स्थापत्य पूल | ७४ | ०३ | ८९५७७००० | ० | ५८९९००० | ८३६७८००० |
| | एकूण | | | | | ८९५७८००० | ५८९९००० | ५८९९००० | ८९५७८००० |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -४२६** — **विषय क्रमांक – ४२६**

**दिनांक- २६/०९/२०२३** — **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४२६**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कक्षेका/वि/जा/३३१/२०२३ दि.२३/०८/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२१४४ दि.२३/८/२०२३ अन्वये, मनपाचे विद्युत क क्षेत्रिय विभागाकडील कामाकरीता आवश्यक तरतूद वर्गीकरण करणेबाबत. |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

**ठराव क्र. ४२६**
**दिनांक-२६/०९/२०२३**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कक्षेका/वि/जा/३३१/२०२३ दि.२३/०८/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२१४४ दि.२३/८/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या क क्षेत्रिय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्र. क्र. ८ मधील पशु - वैद्यकीय दवाखाना येथे मोठ्या मृत जनावरांकरीता नव्याने गॅस दहन मशीन (इन्सिनरेटर) बसविणेकरीता मा. उपायुक्त, पशुवैद्यकीय विभाग यांनी पत्र क्र. पवै/०२/कावि/९१/२०२३ दिनांक १८/०५/२०२३ अन्वये इकडील विभागास कळविले आहे. सदर काम करणेकामी मा.महापालिका सभा ठराव क्र.३०६ दि.२९/०३/२०२३ अन्वये सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकामध्ये पान क्र.४१९ अनु क्र.२ वर कामाचा नव्याने समावेश करणेत आलेला आहे. विषयांकीत कामाचे अंदाजे खर्च र.रु.५,००,००,०००/- यांस मा.महापालिका सभा ठराव क्र.३०६ दि.२९/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाकरिता अंदाजपत्रकामध्ये र.रू.१,०००/- तरतूद करणेत आलेली आहे. सदर कामाकरीता र.रु.१.५० कोटी इतकी तरतूद पशुवैद्यकीय विभागाकडे उपलब्ध आहे. सबब सदर कामाकरीता आवश्यक तरतूद वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत खालीलप्रमाणे मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्र. | लेखाशीर्ष | कामाचे नाव | अंदाज पत्रक पानांक व अनु क्र. | मूळ तरतूद र.रु. | प्रशासकीय मान्यता र.रु. | तरतूद वाढ र. रु. | तरतूद घट र. रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लोकारोग्य (विद्युत विभाग भांडवली) | पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये मोठ्या जनावरांकरीता नवीन इन्सीनरेटर बसविणे. | ४१९/ २ | १००० | ५,००,००,०००/- | १,५०,००,०००/- | ०० |
| २. | पशुवैद्यकीय विभाग (महसूली) | 23051-29 : खरेदी व दुरुस्ती – सी. एन. जी. इन्सिनरेटर | १४३/ ५ | २,००,००,०००/- | -- | ०० | १,५०,००,०००/- |
| | **एकूण** | | | | | १,५०,००,०००/- | १,५०,००,०००/- |

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय
## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४२७** **विषय क्रमांक – ४२७**

**दिनांक-** २६/०९/२०२३ **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४२७**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/शअ/तां/२३/६६/२०२३ दि.२३/०८/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२१४८ दि.२३/८/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात भूमीगत गॅसवाहिनी टाकण्यासाठी रस्ते खोदाई परवानगी देताना एमएनजीएल या संस्थेस चालू दरामध्ये सवलत देणेबाबत. |
| **ठराव क्र. ४२७**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/शअ/तां/२३/६६/२०२३ दि.२३/०८/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठ.क्र.२१४८ दि.२३/८/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात भूमीगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ते खोदाई परवानगी देताना एमएनजीएल या संस्थेस मनपा चालू दरामधील दिली जाणारी सवलत रद्द करणेच्या धोरणात्मक निर्णयास मा. महापालिका सभा ठराव क्र. २२६, दि. १३.१२.२०२२ मान्यता देणेत आलेली आहे. व त्यानुसार एमएनजीएल संस्थेस रस्ते खोदाईकरिता शुल्क आकारण्यात येत आहे. स्वप्नपूर्ती फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्यादीत यांनी एमएनजीएल चे गॅस पाईपलाईन अत्यावश्यक बाब समजून खोदाईसाठी योग्य दराने परवानगी देणेबाबत पत्राने विनंती केली आहे. सदरच्या पत्रावर मा.आयुक्त यांनी पुणे महानगरपालिकेप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने परिपत्रक निर्गत करावे असे शेरांकन केले आहे. सद्यस्थितीमध्ये एमएनजीएल यांना रस्ते पूर्ववत करण्यासाठी मनपाच्या चालू दरानुसार शुल्क आकारणेत येते तसेच त्यांना मनपा अधिभारामध्ये सवलत देणेत येत आहे. मा. आयुक्त यांचे सुचनेनुसार पुणे मनपाप्रमाणे एमएनजीएल यांना चालू दरामध्ये ५०% सवलत द्यावयाचे झालेस त्यांना रस्त्याच्या प्रकारानुसार खालीलप्रमाणे शुल्क आकारावे लागेल. |

| अ.क्र. | रस्त्याचा प्रकार | सद्यस्थितीत आकारणेत येणारे दर प्रति र.मी. | ५०%सवलतीनुसार येणारे दर प्रति र.मी. |
|---|---|---|---|
| १ | जमिनीमधून खोदकाम | ३३१७/- प्रति मीटर | १६६०/- प्रति मीटर |
| २ | खडीमुरूम बीबीएम/एमपीएम सह | ८६३९/- प्रति मीटर | ४३२०/- प्रति मीटर |
| ३ | डांबरी रस्ता | १२१६२/- प्रति मीटर | ६०८१/- प्रति मीटर |
| ४ | फुटपाथ | ११३८८/- प्रति मीटर | ५६९४/- प्रति मीटर |
| ५ | पेव्हींग ब्लॉक | १०५६३/- प्रति मीटर | ५२८२/- प्रति मीटर |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय
## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

| | |
|---|---|
| | तरी एमएनजीएल या संस्थेस रस्ते खोदाई परवानगी देताना वर नमूद केलेनुसार मनपा चालू दरामध्ये ५०%सवलत देणे तसेच त्यांना मनपा अधिभार माफ करणेबाबतचा धोरणात्मक निर्णयाबाबतचा सदरचा प्रस्ताव आहे. तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यात भूमिगत गॅसवाहिन्या टाकणेसाठी एमएनजीएल संस्थेस देण्यात येणा-या परवानगी बाबतच्या अस्तित्वातील धोरणामध्ये बदल व नव्याने अटींचा समावेश करणेबाबतच्या प्रस्तावास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत खालीलप्रमाणे मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४२८** — **विषय क्रमांक – ४२८**

**दिनांक-२६/०९/२०२३** — **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४२८**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/कावि/५८९/२०२३ दि.१२/०९/२०२३ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६ सदरहू अट शिथील करण्याबाबत. |
| ठराव क्र. ४२८<br>दिनांक-२६/०९/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/कावि/५८९/२०२३ दि.१२/०९/२०२३ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम – ४५ अंतर्गत येणारी तसेच इतर वर्ग-१ ची पदे पदोन्नतीने भरताना, त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील अशी अट नमुद आहे. पंरतु, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट-अ संवर्गातील बहुतांश पदे पदोन्नतीने भरणेकामी रिक्त होती. प्रत्यक्ष आस्थापनेवर असलेली पदे व संख्या विचारात घेता कार्यरत असलेल्या अधिकारी यांची संख्या अपुरी असल्याने उपलब्ध अधिका-यांवर कामकाजाचा ताण येत होता. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रादेशिक कार्यक्षेत्राचा विस्तार व वाढलेल्या प्रशासकीय कामकाजाचा व्याप विचारात घेता महापालिकेतील विविध विभागांचे तसेच क्षेत्रीय कार्यालयांचे अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन तसेच नागरिकांची आणि प्रशासकीय कामे जलदगतीने होणे आवश्यक असल्याने व अपवादात्मक परिस्थीतीमुळे महानगरपालिका आस्थापनेवरील गट 'अ' संवर्गातील पदे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ मधील तरतुदीनुसार मा.महानगरपालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत. |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

| | |
|---|---|
| | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ अंतर्गत येणारी सांविधानिक पदांवरील महानगरपालिका नगरसचिवांच्या नेमणूकी व्यतिरीक्त या कलमान्वये केलेल्या प्रत्येक नेमणूकीस शासन मान्यता आवश्यक आहे. तसेच कलम ५३ नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित आहे.<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६ सदरहू अट शिथील करण्यात येवून 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ अंतर्गत नमूद सांविधानिक पदांव्यतिरिक्त उर्वरीत गट–अ मधील पदे पदोन्नतीने भरताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका सभेच्या मान्यतेने भरण्यात यावीत' याप्रमाणे शासन मंजूर पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मध्ये दुरुस्ती करण्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४२९** **विषय क्रमांक – ४२९**

**दिनांक- २६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४२९<br>दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/पापु/१/कावि/११६/२०२३ दि.१४/९/२०२३ अन्वये, "पवना धरणातून से.क्र. २३ जलशुध्दीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणे साठी थेट पाईप लाईन टाकणे " च्या कामामधील प्रस्तावित ज्यादा बाब (Extra Item) नुसार जागा भाडे व सुरक्षा रक्षकांचे दि.१ मे २०१९ ते दि.३१ डिसेंबर २०२३ या कालावधीतील बिल अदा करणे व तसेच मुदतवाढ देणेबाबत. |
| **ठराव क्र. ४२९<br>दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/पापु/१/कावि/११६/२०२३ दि.१४/९/२०२३ अन्वये, पवना थेट पाईप लाईन प्रकल्पामधील आणलेले साहित्य ठेवणेसाठी संबंधित कामाचे ठेकेदार यांनी जागा भाड्याने घेतलेल्या आहेत. तसेच सदर साहित्यांचे रक्षण करणेसाठी सुरक्षा रक्षक ठेकेदाराची नेमणूक करणेत आली आहे. सदर जागेचे भाडे व सुरक्षा रक्षकांची देयके देणे बाबत संबंधित कामाचे ठेकेदार, जागा मालक तसेच सुरक्षा रक्षक ठेकेदार |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय
## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

| | |
|---|---|
| | मागणी करीत आहेत. त्या अनुषंगाने दि. १७/०८/२०२३ रोजी स.११.०० वा. अति आयुक्त (१) दालन, ४ था मजला, महापालिका भवन येथे बैठक झाली आहे. सदर बैठकीमध्ये जागा मालकांचे भाडे व सुरक्षा रक्षकांचे देयक मे २०१९ पासुन पुढे प्रत्यक्ष पाईप्स व इतर सामुग्री स्थलांतरीत होई पर्यंत करारनाम्यातील दराप्रमाणे पवना थेट पाईप लाईन प्रकल्पाचे ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांना अदा करणेत यावे असे ठरले आहे. त्या अनुषंगाने संबंधित ठेकेदार यांना जागा मालकांसोबत झालेल्या करारानुसार भुई भाडे र.रू. ६,३५,८८,५९७/- + GST व सुरक्षा रक्षक देयक र.रू.१,३२,३६,०००/- + GST येवढे देयक येत असुन सदरचा विषय मा. स्थायी समितीमध्ये दि.१७/०८/२०२३ रोजीच्या सभावृत्तांतानुसार ठेवावयाचा आहे. तसेच मोजमाप पुस्तकात नोंद घेण्यासाठी दि.३१/०३/२०२४ रोजी पर्यंत मुदतवाढ घेणे याशिवाय सदरची देयके जादा बाब म्हणून मंजुर करणेस मा. महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक आहे.<br><br>"पवना धरणातून से.क्र. २३ जलशुध्दीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणे साठी थेट पाईप लाईन टाकणे "या कामाचा आदेश ठेकेदार मे. एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांना दि. ३०/०४/२००८ रोजी देणेत आला असून कामाची मूळ मुदत २४ महिने म्हणजेच दि. २९/०४/२०१० पर्यंत होती. सदर काम चालु असतानाच्या दरम्यान दि.०९/०८/२०११ रोजी मुंबई – पुणे द्रुतगती मार्गावर बऊर टोलनाका येथे या प्रकल्पा विरोधात झालेल्या रस्ता रोको आंदोलन प्रसंगी पोलिस गोळीबारात ३ शेतक-यांचा मृत्यु झाला आहे. त्याअनुषंगाने दि. १०/०८/२०११ रोजीच्या पत्रान्वये मा. जिल्हादंडाधिकारी, पुणे यांनी " जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था परिस्थिती अबाधित ठेवण्यासाठी वरिष्ठ पातळीवर सदर योजनेबाबत बैठक होईपर्यंत पवनाधरणातून बंद पाईपलाईन द्वारे पाणीपुरवठा योजनेचे काम तूर्त थांबविणेत यावे"अशी विनंती केली होती. त्यामुळे सदरचे काम दि. १०/०८/२०११ पासून आजतागायत बंद आहे. आतापर्यंत सदरचे काम १२.६२% एवढे पुर्ण झाले असून मुदतवाढ दि. ३१/१२/२०२३ पर्यंत घेणेत आलेली आहे.<br><br>कोणतीही जागा भाडेतत्वावर घेणेकामी नगररचना व विकास विभागाकडील पत्र क्र. नरवि/कावि/४३/२०२३ दि.०६/०१/२०२३ आणि पत्र क्र. नरवि/कावि/४१/८९/२०२३ दि.१६/०३/२०२३ अन्वये प्राप्त झालेल्या दरानुसार लघुत्तम दर घेवुन दि.०१/०५/२०१९ ते दि.२८/०२/२०२३ या कालावधीतील जागा भाडे व सुरक्षा रक्षकाची देयके देणेबाबत मा. प्रशासक ठराव क्र. १६६२ दि.०९/०५/२०२३ अन्वये र.रू.६,६९,७३,१९८/-+GST मान्यता घेण्यात आली होती परंतु संबंधित ठेकेदार व जागा मालक यांनी सदरचे देयक घेण्यास नकार देवुन संबंधित ठेकेदारासोबत झालेल्या करारानुसार भुई भाडे अदा करावे व संपुर्ण भाडे दिल्याशिवाय पाईप स्थलांतरीत करू नये अशी मागणी दि.१९/०६/२०२३ रोजीच्या पत्रांन्वये केलेली आहे. तसेच सदर पत्रांन्वये तसेच दुय्यम निबंधक वडगाव मावळ यांच्याकडील दि.२४/०५/२०२३ रोजीच्या पत्रांन्वये अधिकतम दराने भुईभाडे मिळणेबाबत विनंती केली आहे. |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

सदर वाद सामंजस्याने मिटविणे व पाईप ताब्यात घेणेकामी दि.१७/०८/२०२३ रोजी मा. अति. आयुक्त (१) यांचे समवेत स. ११.०० वा. बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीत"पवना धरणातून से.क्र. २३ जलशुध्दीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणे साठी थेट पाईप लाईन टाकणे"या कामामधील जागा भाडे, सुरक्षा रक्षकांची देयके ठेकेदार यांनी केलेल्या जागामालक व सुरक्षा ठेकेदार सोबत झालेल्या करारनामाप्रमाणे दि.०१ मे २०१९ पासुन ते दि.३१ डिसेंबर २०२३ या कालावधीसाठी मा. स्थायी समितीची मान्यता घेवुन संबंधित ठेकेदारास भुई भाडे व सुरक्षारक्षक देयके अदा करण्याचे ठरले. संबंधित ठेकेदारास भुई भाडे व सुरक्षा रक्षकाची देयके सद्यस्थितीत वर नमूद करारनाम्यानुसार अदा न झाल्यास पाईप स्थलांतरित करणेचा प्रश्न चिघळु शकतो व परिणामी पवना पाईपलाईन व इतर साहीत्य स्थलांतरीत करण्याचा कालावधी वाढून मनपास होणारे आर्थिक नुकसान वाढु शकते.

दिनांक १७/०८/२०२३ रोजी ठेकेदार व जागामालक यांचे सोबत बैठक होऊन खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

**निर्णयः-**पवना थेट पाईप लाईन अंतर्गत ठेवणेत आलेले पाईप व मशिनरी यांचे जागा भाडे खाजगी जागा मालकांना मे २०१९ पासुन पुढे प्रत्यक्ष पाईप व इतर सामुग्री स्थलांतरित होई पर्यंत ठेकेदाराशी त्यांनी केलेल्या करारनाम्यातील दराप्रमाणे मा. स्थायी समितीची व मा.महापालिका सभेची मान्यता घेऊन संबंधित ठेकेदार मे. एनसीसी एसएमसी इंदू (जेव्ही) यांना अदा करणेत यावे.

ठेकेदार यांचेशी झालेल्या जागा मालक / सुरक्षा ठेकेदार यांचेतील करारनाम्यानुसार अदा करावयाच्या रक्कमेचा तपशिल (दि.०१/०५/२०१९ ते दि.३१/१२/२०२३ पर्यंत) खालील प्रमाणे आहे.

तक्ता क्र.१

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | मनपाचे पाईप ठेवलेले जागेचे जागा मालक / सुरक्षा ठेकेदाराचे नाव | ठेकेदार यांचेशी झालेल्या जागा मालक / सुरक्षा ठेकेदार यांचेतील करारनाम्यानुसार खर्च र.रु. (दि.०१/०५/२०१९ ते दि.३१/१२/२०२३ पर्यंत) |
|---|---|---|---|
| १ | मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) | श्री. विठ्ठल कुंडलिक भोसले | **७३,८४,७७६/-** |
| २ | | श्री. सुभाष रघुनाथ जाधव/ श्री. महेश सदानंद शेट्टी | **२,२६,८५,३१४/-** |
| ३ | | श्री. धनंजय नयनसुखजी नवलाखा | **३,३५,१८,५०७/-** |
| | | जागा भाडे एकूण र.रु. | **६,३५,८८,५९७/-** |
| ४ | | मे. मॉर्डन सिक्युरिटी सर्व्हिसेस | **१,३२,३६,०००/-** |
| | | एकूण र.रु. | **७,६८,२४,५९७/-** |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय
## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

| | |
|---|---|
| | वरील रक्कम महानगरापालिका मुळ ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांना अदा करेल.<br><br>मा.प्रशासक ठराव क्र. १६६२, दि.०९/०५/२०२३ अन्वये र.रू.६,६९,७३,१९८/- चा ठराव रद्दबदल करून वरील निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेकामी उपरोक्त संबंधित कामाचे ठेकेदार मे.एनसीसी एसएमसी इंदू (जेव्ही) यांना जागा भाडे र.रु. ६,३५,८८,५९७/- + G.S.T.व सुरक्षा रक्षक ठेकेदार यांची देयके र.रु.१,३२,३६,०००/-+ G.S.T. यांचे देयक संबंधित ठेकेदाराशी झालेल्या करारनाम्याच्या दराप्रमाणे दि.१ मे २०१९ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधी साठी एकूणर.रु. ७,६८,२४,५९७/- + G.S.T. एवढी येत आहे. तरी सदरचे देयक देणेस हरकत वाटत नाही. सदरचे देयक देणेकरीता मा. महापालिका सभेची मान्यता घ्यावी लागणार आहे. तरी त्या अनुषंगाने मा.प्रशासक ठराव क्र. १६६२, दि.०९/०५/२०२३ अन्वये र.रू.६,६९,७३,१९८/- चा ठराव व या विषयांबाबत यापुर्वी झालेले सर्व निर्णय रद्द करणेस तसेच सुधारित तक्ता क्र.१ नुसार संबंधित ठेकेदाराशी झालेल्या करारनाम्याच्या दराप्रमाणे दि.१ मे २०१९ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधी साठी एकूणर.रु. ७,६८,२४,५९७/- + G.S.T. सह ठेकेदारास अदा करणेकामी व मोजमाप पुस्तकात नोंद घेणेसाठी दि. ३१/०३/२०२४ पर्यंत मुदतवाढ घेणे, तसेच सदरची देयके जादा बाब म्हणून अदा करणे कामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -४३०** **विषय क्रमांक – ४३०**

**दिनांक- २६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४३०<br>दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जशुके/पापु/कावि/१/५१०/२०२३ दि.१५/९/२०२३ अन्वये, " प्रकल्पातील ठेकेदार/ऑपरेटरच्या SIP-VIII च्या मान्यतेबाबत व त्याअनुषंगाने याप्रकल्पाअंतर्गत वाढीव खर्चास व सुधारीत प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे बाबत. |
| **ठराव क्र. ४३०<br>दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जशुके/पापु/कावि/१/५१०/२०२३ दि.१५/९/२०२३ अन्वये, सदर प्रकल्प हा ईपीसी (Engineering, Procurement and Construction) प्रकारचा असून देखभाल दुरुस्तीसह प्रस्तावित आहे. त्यामुळे निवेदेतील |

अपेक्षित उदिष्ट पुर्तीसाठी मंजूर निविदेतील रक्कमेत वाढ होत असली व कामाचे परिमाणात जरी बदल झाला तरी सदर प्रकल्प पूर्ण करणे साठी आवश्यक आहे. यामुळे ठेकेदारने / ऑपरेटरने SIP (सिस्टीम इम्प्रुमेंट प्लॅन) तयार करुन योजनेची कामे पूर्ण करणे अनिवार्य आहेत. त्याप्रमाणे ठेकेदार / ऑपरेटर SIP-VIII मंजुरीकरीता सादर केली आहे. सद्यस्थितीमध्ये योजनेची भौतिक प्रगती ९२% व आर्थिक प्रगती ८३% इतकी आहे. सदर प्रकल्पाची मंजूर किंमत रक्कम रु.१५५.६४ कोटी असून आतापर्यंत र.रु.१२८.९९ कोटी इतका खर्च झालेला आहे.

- एकंदरीत प्रकल्पावर होणारा खर्च र.रु. १७८.७२ कोटी
- प्रकल्पाला लागणारा अतिरिक्त वाढीव खर्च – र.रु.२३.०८ कोटी

सदर प्रकल्पांतर्गत SIP-VII (डिझाईन) व BOQ च्या परिमाणात वरील नमूदप्रमाणे अपेक्षित खर्च २३.०८ कोटीची वाढ लक्षात घेता सुधारित र.रू. १७८.७२ कोटी इतका खर्च होत आहे. तथापि विषयांकित कामास र.रू.२१३.७५ कोटीची (Capex र.रू.१५५.६४+Opex र.रू.५१.९४) इतक्या रक्कमेस प्रसासकीय मान्यता आहे. वरील होणा-या वाढीव खर्चामुळे र.रू.२३०.६६ कोटी (Capex र.रू.१७८.७२+Opex र.रू.५१.९४) इतक्या रकमेस मा. महापालिका सभेची सुधारीत खर्चास व सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाच्या ''पिंपरी चिंचवड शहरातील ४०% भागात २४×७ पूर्ण दाबाने पाणीपुरवठा योजना राबविणेव ५ वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती (O&M) करणे'' या कामाचा र.रु. १६० कोटी इतक्या रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सन २०१३ ला मंजुरीसाठी शासनाकडे सादर करण्यात आला होता. या प्रकल्पास केंद्र शासनाच्या केंद्रीय मंजुरी व संनियमन समितीने (Central Sanctioning and Monitoring Committee) यांनी दि.१७/१२/२०१३च्या सभेत र.रु. १४३.१७ कोटी इतक्या रकक्कमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजुरी प्रदान केली आहे. सदर र.रु १४३.१७ कोटी ही रक्कम फक्त Construction (Capex) कामासाठीची असून देखभाल दुरुस्तीचा म्हणजेच (O&M-Opex) खर्च महापालिकेने करावयाचा आहे.

सदर प्रकल्पास मा. महापालिका सभा ठराव क्रमांक २७४, दि.०९/०५/२०१३ अन्वये र.रू. २१३.७५ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सदर प्रकल्पास "पिंपरी चिंचवड शहरातील ४०% भागात २४×७ पूर्ण दाबाने पाणीपुरवठा योजना राबविणे व ५ वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती (O&M) करणे या कामाकरिता करीता मे.विश्वराज इन्फ्रास्ट्रक्चर लि. नागपूर यांना ठेकेदार / ऑपरेटर म्हणून दि.१८/०६/२०१६ रोजी कामाचा आदेश देण्यात आला आहे.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय
## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

JnNURM अंतर्गत या प्रकल्पाकरीता निधी वितरण करण्याची प्रणाली व प्रकल्पास प्राप्त निधी व महाराष्ट्र शासनाकडून नवीन धोरणानुसार अमृत योजनेअंतर्गत प्राप्त करावयाचा निधी याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | केंद्र शासन<br><br>(र.रु. कोटी) | राज्य शासन<br><br>(र.रु. कोटी) | एकूण<br><br>(र.रु. कोटी) |
|---|---|---|---|
| एकूण देय निधी | ७१.५८६ | २८.६३४ | १००.२२ |
| एकूण प्राप्त निधी | २८.६३४ | ११.४५२ | ४०.०८६ |
| उर्वरीत निधी | ४२.९५२ | १७.१८२ *(अ) | ६०.१३४ |

दि.२१/०८/२०१७ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने अमृत योजनेंतर्गत सदर प्रकल्प अमृत अंतर्गत समाविष्ट करण्यात आला. नव्याने सुनिश्चित करण्यात आलेली वितरण प्रणाली खालीलप्रमाणे आहे.

केंद्र शासन हिश्श्यापोटी देय असणा-या उर्वरीत निधीपैकी मनपाने उचलावयाचा भार खालीलप्रमाणे :

- o राज्य शासन : रु.४२.९५२ कोटीच्या ८० टक्के – रु.३४.३६१ कोटी *(ब)
- o पिं.चिं.मनपा : र.रु.४२.९५२ कोटीच्या २० टक्के - र.रु.८.५९ कोटी
- · राज्य शासनाकडून नव्याने देय असणारा उर्वरीत निधी : १७.१८२ + ३४.३६१ (अ + ब)

: र.रु.५१.५४३ कोटी

- · पिं.चिं.मनपास करावा लागणारा एकूण निधी : ४२.९५२ + ८.५९०

(म.न.पा. हिस्सा) : र.रु.५१.५४२ कोटी

त्याशिवाय राज्य शासनाकडून महापालिकेस अमृत योजनेंतर्गत र.रु.५१.५४३ कोटीचा उर्वरीत निधीसाठी सातत्याने पाठपुरावा करुन सुध्दा निधी अप्राप्त आहे. सदर निधी प्राप्त न झाल्यास तसेच Price Variation, GSTयाकरीता सुध्दा तरतुद महानगरपालिकेस करावी लागेल.

सदर प्रकल्प हा ईपीसी (Engineering, Procurement and Construction)प्रकारचा असून देखभाल दुरुस्तीसह प्रस्तावित आहे. त्यामुळे निवेदेतील अपेक्षित उदिष्ट पुर्तीसाठी मंजूर निविदेतील रक्कमेत वाढ होत असली व कामाचे परिमाणात जरी बदल झाला तरी सदर प्रकल्प पूर्ण करणे साठी आवश्यक आहे. यामुळे ठेकेदाराने / ऑपरेटरने SIP (सिस्टीम इम्प्रुमेंट प्लॅन) तयार करुन योजनेची कामे पूर्ण करणे

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

अनिवार्य आहेत. त्याप्रमाणे ठेकेदार / ऑपरेटर SIP-VIII मंजुरीकरीता सादर केली आहे. सद्यस्थितीमध्ये योजनेची भौतिक प्रगती ९२%व आर्थिक प्रगती ८३% इतकी आहे. सदर प्रकल्पाची मंजूर किंमत रक्कम रु.१५५.६४ कोटी असून आतापर्यंत र.रु.१२८.९९ कोटी इतका खर्च झालेला आहे. ठेकेदार/ ऑपरेटरने अन्वये र.रु.१७८.७२ कोटीचा SIP-VIII मंजुरीकरीता सादर केला असून त्याचे विभाजन खालीलप्रमाणे आहे:

· सुधारित (BOQ) - र.रु.१६८.९५ कोटी
· मंजूर अतिरिक्त बाबी - र.रु.९.६२ कोटी
· प्रस्तावित अतिरिक्त बाबी - र.रु.०.१५ कोटी

--------------------------

SIP-VIIIप्रमाणे - र.रु. १७८.७२ कोटी

सदर प्रकल्पाचे किंमतीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| प्रकल्पाची मंजूर निविदा रक्कम | SIP-VII अन्वये सादर केलेल्या बाबींसाठीची रक्कम | SIP-VIII अन्वये सादर केलेली रक्कम | सल्लागार DRA यांनी SIP-VIII ची मान्यता दिलेली रक्कम | प्रकल्पावर झालेला खर्च (RA 26 पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| रु.१५५.६४ कोटी | रु. १५५.२० कोटी | रु. १७८.७२ कोटी | रु. १७८.७२ कोटी | रु.१२८.९९ कोटी |

· एकंदरीत प्रकल्पावर होणारा खर्च र.रु. १७८.७२ कोटी

· प्रकल्पाला लागणारा अतिरिक्त निधी – र.रु.२३.०८ कोटी

सदर प्रकल्पात प्रत्यक्ष जागेवरील परिस्थितीत विचारात घेता ठेकेदाराने/ऑपरेटरने सादर केलेल्या डिझाईनच्या व्यतिरिक्त खालील काही कारणांमुळे निविदा कामात वाढीव खर्च झालेला आहे.

१) JnNURM योजनेअंतर्गत चालू असलेल्या कामाचा DPR (प्रकल्प अहवाल) हा सन २०१२-१३ मध्ये बनविला होता व त्यानुसार असलेल्या भौगोलिक परिस्थिती म्हणजे अस्तित्वातील रस्ते, गल्ल्या, वसाहती, इमारती यानुसार बनविणेत आला होता. तदनंतर १० ते ११ वर्षामध्ये फार मोठ्या प्रमाणात फरक झालाआहे. डी.पी., नॉन डी.पी. रस्ते, इमारती, वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात आडवी व उभी (Horizontally & Vertically) वाढ झाली. त्यामुळे प्राप्त परिस्थितीनुसार ऑपरेटरला SIP मध्ये ब-याच मोठ्या प्रमाणात BOQ मधील परिमाणापेक्षा अधिक परिमाण करावी लागेल.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.**
**नगरसचिव कार्यालय**
**मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय**

| | |
|---|---|
| | २) प्रत्यक्ष पाईपलाईन टाकतेवेळी जर पाईपलाईन खुप खोलवर असेल किंवा अशुद्ध पाण्याची वारंवार तक्रार असेल किंवा सद्यस्थितीतील पाईपलाईनमधून पाणी गळतीची तक्रार जास्त असेल तर अशा पाईपलाईन सुध्दा प्रत्यक्ष साईटवर Decision Sheet घेऊन बदलण्यात आल्या आहेत. सुधारित डिझाईन SIP मध्ये मंजूर निविदा परिमाणापेक्षा ५५ कि.मी.अतिरिक्त पाईपलाईन टाकाव्या लागल्या आहेत.<br><br>३) उपरोक्त कारणास्तव पाईप Quantity वाढल्यामुळे, Road Restoration तसेच<br><br>Sluice Valve Quantity व इतर सामुग्री मध्ये देखील वाढ झालेली आहे.<br><br>४) शहरामध्ये रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, ड्रेनेज पाईपलाईन टाकणे, स्मार्ट सिटीमार्फत सुरु असलेली विकास कामे वेगवेगळया विभागामार्फत चालू आहेत व या कामांतर्गत होणारी तूट फुट देखील वेळोवेळी दुरुस्त करावी लागत आहे त्यामुळेही परिमाणात वाढ झालेली आहे.<br><br>५) मंजूर निविदा सन २०१५-१६ च्या मंजूर दरपत्रकानुसार आहे व निविदेत भाववाढ फरक लागू आहे. (Price Variation Clause) त्यामुळे खर्चात वाढ होत आहे.<br><br>६) करारनाम्यातील BOQ मध्ये समाविष्ट नसलेल्या परंतु योजनेचे काम पूर्ण करणेकरीता आवश्यक असलेल्या अतिरिक्त बाबी (Extra Items)म्हणून मंजुरी घेऊन करण्यात आलेल्या आहेत.<br><br>सदर काम नियमित कामासारखे नसून या प्रकल्पाचा मुख्य उद्देश पाण्याची गळती कमी करणे व ते पाणी इतर भागात उपयोगात आणता येईल त्यामुळे हिशोबबाह्य पाणीपुरवठा (NRW) यामध्ये सुधारणा होणार आहे.<br><br>सद्यस्थितीमध्ये प्रायोगिक स्तरावर DMA- 3, Zone A1, हा २४x७ मध्ये रुपांतरीत करण्यात आला असून, त्यामुळे हिशोबबाह्य पाणीपुरवठा (NRW) ४४% वरून ३०% आलेला आहे. त्यामुळे NRW मध्ये सुधारणा करण्याकरीता प्रकल्प पूर्ण करणे गरजेचा आहे.<br><br>त्यामुळे पिंपरी चिंचवड शहराकरीता सदर प्रकल्प पूर्ण होणे नितांत गरजेचे असून सदर ठेकेदारास/ऑपरेटरास माहे सप्टेंबर -२०२२ पर्यंत (Global Covid-19 Pandemic, lockdown break the chain ग्राह्य धरुन) काम पूर्ण करण्याकरीता मुदतवाढ देण्यात आली होती.<br><br>या प्रकल्पाचा मुख्य उद्देश ४०% भागातील रहिवाशांना २४x७ अखंडीत पाणीपुरवठा करणे व पाण्याची तूट भरुन काढणे आहे. त्यामुळे योजनेतील शिल्लक कामे पूर्ण करुन घेणे गरजेचे आहे. |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

| | |
|---|---|
| | उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता सदर महत्वाकांक्षी प्रकल्पाचा खर्च आटोक्यात राहून प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक आहे. सदर प्रकल्पांतर्गत SIP-VIII (डिझाईन) व BOQ च्या परिमाणात वरील नमूदप्रमाणे अपेक्षित खर्च र.रु.२३.०८ कोटीची वाढ लक्षात घेता सुधारित र.रु.१७८.७२ कोटी इतका खर्च होत आहे. तथापि विषयांकित कामास र.रू.२१३.७५ कोटी (Capex र.रू.१५५.६४+Opex र.रू.५१.९४) इतक्या रक्कमेस प्रसासकीय मान्यता आहे. वरील होणा-या वाढीव खर्चामुळे र.रू.२३०.६६ कोटी (Capex र.रू.१७८.७२+Opex र.रू.५१.९४) कोटी इतक्या सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -४३१** **विषय क्रमांक – ४३१**

**दिनांक- २६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४३१**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. वायसीएमएच/१/कावि/१६७५/२०२३, दि.१३/०९/२०२३ अन्वये, अध्यापकांचे सेवानिवृत्ती वयाबाबत. |
| ठराव क्र. ४३१<br>दिनांक-२६/०९/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. वायसीएमएच/१/कावि/१६७५/२०२३, दि.१३/०९/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवर शासन मान्यतेने पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे अध्यापक संवर्गातील विविध पदे, विविध आदेशान्वये भरणेत आलेली आहे.<br><br>पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय ही वैद्यकिय शिक्षण देणारी संस्था असल्यामुळे मनपा स्थायी आस्थापनेवर अध्यापक संवर्गातील नियुक्त्या करतेवेळी सेवाप्रवेश वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता व अनुभव हे महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मेडीकल कौन्सील ऑफ इंडिया यांच्या मंजुरीने व नियमानुसार केलेले आहेत.<br><br>महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सेनिवे – २११४/प्र.क्र.४ /१४/वैसेवा – १ दिनांक २८ जुलै, २०१४ अन्वये अधिष्ठाता, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक यांचे नियतवयोमान सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षावरुन ६३ वर्ष व महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय सेवानि – २११५/प्र.क्र.८१/१५/वैसेवा-१ दिनांक ०५/०३/२०१५ अन्वये अधिष्ठाता, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक ६२ वर्षावरुन ६४ वर्ष करण्यास मान्यता देणेत आलेली आहे. त्यास अनुसरुन पिंपरी चिंचवड |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय
## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

| | |
|---|---|
| | महानगरपालिका पदव्युत्तर संस्थेतील अधिष्ठाता, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक यांचे नियतवयोमान सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६४ वर्ष करणेकामी चा विषय मान्यतेकामी मा. महापालिका सभेपुढे ठेवणे आवश्यक आहे.<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पदव्युत्तर संस्थेसाठी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.पीसीसी-३०१३/प्र.क. ६०१/नवि-२२, दिनांक ४ मार्च २०१४, अन्वये विविध संवर्गातील एकुण ११८ पदांना मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात सद्यस्थितीत ५५ पदे स्थायी अस्थापनेवर कार्यरत आहेत. आस्थापना मंडळामार्फत पदे भरण्यासाठी काही कालावधी लागणे अपरिहार्य असते. तसेच काही आरक्षित प्रवर्गांवर प्रयत्न करुन देखील उमेदवार उपलब्ध होत नाहीत शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकीय पदे ही शैक्षणिक पदे असल्यामुळे ती रिक्त ठेवल्यास विद्यार्थीहित व रुग्णसेवा यावर प्रतिकुल परिणाम होतो. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या अध्यापकांची वयोमर्यादा वाढविल्यामुळे सदर अध्यापक अध्यापनास उपलब्ध होतील.<br><br>महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सेनिवे – २११४/प्र.क्र.४ /१४/वैसेवा – १ दिनांक २८ जुलै, २०१४ अन्वये अधिष्ठाता, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक यांचे नियतवयोमान सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षावरुन ६३ वर्ष व महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय सेवानि – २११५/प्र.क्र.८१/१५/वैसेवा-१ दिनांक ०५/०३/२०१५ अन्वये अधिष्ठाता, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक ६२ वर्षावरुन ६४ वर्ष करण्यास मान्यता देणेत आलेली आहे. राज्य शासन निर्णयाच्या धर्तीवर बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/२२/ दिनांक २८/०२/२०२३ अन्वये महानगरपालिका वैद्यकीय, दंत महाविद्यालयातील अध्यापक, अधिष्ठाता व संचालक यांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षावरुन ६४ करण्यात आलेले आहे.<br><br>सबब महाराष्ट्र राज्य शासन निर्णय व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील परिपत्रकाच्या धर्तीवर पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामधील अधिष्ठाता व अध्यापकांचे (प्राध्यापक सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक) यांची नियत वयोमान सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६४ वर्ष करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत खालीलप्रमाणे मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४३२** **विषय क्रमांक – ४३२**

**दिनांक- २६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४३२**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जलनि:सारण/३८१/२०२३, दि.२०/०८/२०२३ अन्वये, मनपाचे प्रभाग क्र.११ चिखली स्वस्त घरकुल योजना परिसरात संप व पंप हाऊस बांधणे या कामाची अंमलबजावणी करणे बाबत. |
| **ठराव क्र. ४३२**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जलनि:सारण/३८१/२०२३, दि.२०/०८/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्याक्षेत्रांतंर्गत प्रभाग क्र. ११ चिखली स्वस्त घरकुल योजना परिसरात संप व पंप हाऊस बांधणे या कामाचा महापालिका अंदाजपत्रक सन २०२३-२४ अंतर्गत जलनि:सारण विभाग अमृत २.० योजना लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र. ९०० व अक्र ०६ अन्वये समावेश आहे. सदर कामामध्ये चिखली येथील घरकुल योजना व परीसरासाठी ५ एम. एल. डी. क्षमतेचा संप व पंप हाउस बांधणेचा समावेश आहे . सदर संप व पंप हाउस कामाचा शासनाच्या अमृत २.० योजने अंतर्गत समावेश करून सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या व लघुत्तम ठेकेदार मे. डब्लू टी इ इन्फ्रा प्रोजेक्ट्स यांना सदर कामाचा कार्यादेश देणेत आला आहे. चिखली येथील अस्तित्वातील नेवाळेवस्ती संप व पंप हाउस वर क्षमतेपेक्षा येणारा जास्तीचा प्रवाह मलनि:सारण नलिके द्वारे गुरुत्व दिशेने अमृत-१ योजने अंतर्गत होत असलेल्या चिखली रिव्हर रेसिडन्सी जवळील मैलाशुद्धीकरण केंद्रात पाठविणे शक्य होणार आहे. त्यामुळे विषयांकीत चिखली येथील घरकुल योजना परीसरासाठी स्वतंत्र संप व पंप हाउस बांधणे सद्यस्थितीत आवश्यक वाटत नाही. तसेच चिखली स्मशानभूमी येथे चिखली गावठाण, तळवडे गावठाण, शेलारवस्ती, बागवस्ती, तुकाराम नगर ह्या भागातून येणाऱ्या मैलापाण्याकरिता संप व पंप हाउस प्रस्तावित असून सदर प्रकल्प जागे अभावी बरेच वर्ष प्रलंबित आहे. प्रस्तावित चिखली स्मशानभूमी येथील संप व पंप हाउस होणे हे इंद्रायणी नदी प्रदूषण रोखण्या करिता आवश्यक आहे.सबब, सदर प्रभाग क्र . ११ चिखली स्वस्त घरकुल योजना परिसरात संप व पंप हाऊस बांधणे या कामाची अंमलबजावणी चिखली स्मशान भूमी लगत असलेल्या मोकळया जागेत करणेकामीचा विषय नजीकच्या मा.महासभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडेस निर्णयार्थ सादर करणे आवश्यक आहे. विषयांकित पंप हाउस हे चिखली येथील अस्तित्वातील नेवाळेवस्ती संप व पंप हाउस वर क्षमतेपेक्षा येणारा जास्तीचा प्रवाह कमी करण्यासाठी व त्यामुळे वारंवार होणारे मलनि:सारण नलिकांचे चोकअप थांबविण्यासाठी प्रस्तावित करणेत आला होता.तथापि सद्यस्थितीत शासनाच्या अमृत-१ योजने अंतर्गत चिखली रिव्हर रेसिडन्सी जवळ राष्ट्रीय हरित लवाद प्रकरणी रखडलेले मैलाशुद्धीकरण केंद्राचे काम पुनःश्च सुरु करणेत आले असून लवकरच ते पूर्णत्वास येईल. सदर चिखली रिव्हर रेसिडन्सी जवळ मैलाशुद्धीकरण केंद्र झालेने चिखली येथील अस्तित्वातील नेवाळेवस्ती संप व पंप हाउस वर क्षमतेपेक्षा येणारा जास्तीचा प्रवाह मलनि:सारण नलिके द्वारे गुरुत्व दिशेने अमृत-१ योजने अंतर्गत होत असलेल्या चिखली रिव्हर रेसिडन्सी जवळील मैलाशुद्धीकरण केंद्रात पाठविणे शक्य होणार आहे. त्यामुळे विषयांकीत चिखली येथील घरकुल योजना परीसरासाठी स्वतंत्र संप व पंप हाउस बांधणे सद्यस्थितीत आवश्यक वाटत नाही.तसेच चिखली स्मशानभूमी येथे चिखली गावठाण, तळवडे |

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय
## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

| | |
|---|---|
| | गावठाण, शेलारवस्ती, बागवस्ती, तुकाराम नगर ह्याभागातून येणाऱ्या मैलापाण्याकरिता संप व पंप हाउस प्रस्तावित असून सदर प्रकल्प जागे अभावी बरेच वर्ष प्रलंबित आहे. प्रस्तावित चिखली स्मशानभूमी येथील संप व पंप हाउस होणे हे इंद्रायणी नदी प्रदूषण रोखण्या करिता आवश्यक आहे.सदरचा चिखली स्मशानभूमी येथील संप व पंप हाउस बांधणेची तातडीची आवश्यकता पाहता विषयांकित प्रभाग क्र . ११ चिखली स्वस्त घरकुल योजना परिसरात संप व पंप हाऊस बांधणे या कामाची अंमलबजावणी चिखली हिंदू स्मशानभूमी व आरक्षित ख्रिश्चन स्मशानभूमी जागे लगत असलेल्या मोकळया जागेत बांधावे असे वाटते. त्यामुळे बरेच वर्ष प्रलंबित असलेला प्रस्तावित संप व पंप हाउस चा प्रश्न सुटणार असून इंद्रायणी नदीचे प्रदूषण रोखण्यास मदत होणार आहे. ठेकेदार मे डब्लू टी ई इन्फ्रा यांना देण्यात आलेल्या कार्यादेशातील निविदेतील Special conditions of contract page no 33 serial no 11नुसार,11) Change in Site: Location of pumping station is indicative. PCMC has full right to relocate sites for unforeseen reasons. No claims shall be paid on account of reasonable change in site. अन्वये साईट मध्ये बदल करता येणे शक्य आहे. प्रभाग क्र . ११ चिखली स्वस्त घरकुल योजना परिसरात संप व पंप हाऊस बांधणे या कामाची अंमलबजावणी चिखली स्मशान भूमी लगत असलेल्या मोकळया जागेत करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४३३** — **विषय क्रमांक – ४३३**

**दिनांक- २६/०९/२०२३** — **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४३३<br>दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जनि/मु.का/तां/३८२/२०२३ दि.२०/०९/२०२३ अन्वये,मौजे किवळे येथिल सर्व्हे नं-९६ अस्तित्वातील पंप हाउस येथे Energy Saving करिता नवीन आवश्यक त्या क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देणे बाबत. |
| **ठराव क्र. ४३३<br>दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जनि/मु.का/तां/३८२/२०२३ दि.२०/०९/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे किवळे येथिल सर्व्हे नं-९६ अस्तित्वातील पंप हाउस येथे Energy Saving करिता नवीन आवश्यक त्या क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे हे काम नियोजित आहे. सदर कामाचा म.न.पा. च्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात पा नं ६८१ अ क्र २१ वर समावेश आहे. सदर ठिकाणी दहा एम एल डी |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय
## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

| | |
|---|---|
| | क्षमतेचे मैलाशुद्धीकरण प्रकल्प करण्याचे उद्देशून सदर कामाकरिता म.न.पा. च्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात अंदाजपत्रकीय रक्कम हि ३० कोटी इतकी ठेवण्यात आली होती . त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करून मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खाली होणाऱ्या अंदाजपत्रकीय समिती पुढे दिनांक २६/०६/२०२३ रोजी ठेवण्यात आले असता मा. आयुक्त यांनी मौजे किवळे येथिल सर्व्हे नं-९६येथे किवळे-रावेत-मामुर्डी भागात झपाट्याने होणारे गृहप्रकल्प पहाता महापालिकेच्या ताब्यात असलेल्या जागे नुसार जास्तीत जास्त क्षमतेचे मैलाशुद्धीकरण प्रकल्प बांधण्याचे आदेश दिले. त्यानुसार सदर मौजे किवळे येथिल सर्व्हे नं-९६ येथे पन्नास गुंठे क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात असून तीथे वीस एम एल डी क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुसार वीस एम एल डी क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे करिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सुधारीत दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम ५५ कोटी इतकी येत आहे. त्यानुसार विषयांकित कामाकरिता म.न.पा. च्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात अंदाजपत्रकीय रक्कमे मध्ये सुधारणा करणे आवश्यक असलेने त्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br><br>सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे किवळे येथिल सर्व्हे नं-९६ अस्तित्वातील पंप हाउस येथे Energy Saving करिता नवीन आवश्यक त्या क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणेहेकाम नियोजित आहे.प्रस्तुत ठिकाणी सध्या मोठ्या प्रमाणात पवना नदीचे प्रदूषण होत असल्याने ते रोखण्या करीता तातडीने उपायोजना करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या 'ब' क्षेत्रियकार्यक्षेत्रांतर्गत किवळे या दाट लोकवस्तीच्या भागाचा समावेश होतो.सदर ठिकाणी पवना नदी काठावर किवळे येथिल सर्व्हे नं-९६ येथे दहा एम एल डी क्षमतेचे संप पंप हाउस अस्तित्वात आहे, सद्यस्थितीत सदर ठिकाणी रावेतच्या काही भागातून तसेच किवळे व मामुर्डी भागातून जमा होणारे मैलापाणी संप पंप हाउस द्वारे पंपिंग करून रावेत येथील मैलाशुद्धीकरण केंद्रात पाठवले जाते. परंतु रावेत व किवळे भागाची डेव्हलपमेंट झपाट्याने होत असून सदर ठिकाणाहून जमा होणारे मैलापाणी हे रावेत येथील मैलाशुद्धीकरण केंद्राच्या क्षमतेपेक्षा जास्त जमा होत आहे. सबब रावेत येथील मैलाशुद्धीकरण केंद्राचा ताण कमी करण्याच्या दृष्टीने तसेच विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने मौजे किवळे येथिल सर्व्हे नं-९६ अस्तित्वातील पंप हाउस येथे नवीन आवश्यक त्या क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे आवश्यक आहे. त्यानुसार दहा एम एल डी क्षमतेचे मैलाशुद्धीकरण प्रकल्प करण्याचे उद्देशून सदर कामाकरिता म.न.पा. च्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात अंदाजपत्रकीय रक्कम हि ३० कोटी इतकी ठेवण्यात आली होती. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करून मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खाली होणाऱ्या अंदाजपत्रकीय समिती पुढे २६/०६/२०२३ रोजी ठेवण्यात आले असता मा. आयुक्त यांनी मौजे किवळे येथिल सर्व्हे नं-९६ येथे किवळे-रावेत-मामुर्डी भागात झपाट्याने होणारे गृहप्रकल्प पहाता महापालिकेच्या ताब्यात असलेल्या जागे नुसार जास्तीत जास्त क्षमतेचे मैलाशुद्धीकरण प्रकल्प बांधण्याचे आदेश दिले. त्यानुसार सदर मौजे किवळे येथिल सर्व्हे नं-९६ येथे पन्नास गुंठे क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात असून तीथे वीस एम एल डी क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुसार वीस एम एल डी क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

| | |
|---|---|
| | करिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सुधारीत दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम ५५ कोटी इतकी येत आहे. त्यानुसार विषयांकित कामाकरिता म.न.पा. च्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात अंदाजपत्रकीय रक्कमे मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करणे आवश्यक आहे. |

| अनु.क्र | कामाचे नाव | अर्थसंकल्प पृष्ठ.क्र | अर्थ संकल्प अनु.क्र | अंदाज पत्रकिय रक्कम रुपये | सन २०२१-२२ चा मुळ अंदाज रक्कम रुपये | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजेकिवळे येथिल सर्व्हे नं-९६अस्तित्वातील पंप हाउस येथे Energy Savingकरिता नवीन आवश्यक त्या क्षमतेचे मैलाशुद्धीकरणकेंद्र बांधणे | ६८१ | २१ | ३०,००,००,०००/- | १०,००,०००/- | मूळ कामाचे नाव व अंदाजपत्रकीय रक्कम |
| | मौजेकिवळे येथिल सर्व्हे नं-९६अस्तित्वातील पंप हाउस येथे Energy Savingकरिता नवीन आवश्यक त्या क्षमतेचे मैलाशुद्धीकरणकेंद्र बांधणे | ६८१ | २१ | ५५,००,००,०००/- | १०,००,०००/- | मुळ कामाचे नाव व सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम |

तरी नागरिकांच्या सोयीसाठी सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच नदी प्रदूषणात होणारी वाढ रोखण्यासाठी मौजे किवळे येथिल सर्व्हे नं-९६ येथे नवीन मैलाशुद्धीकरण केंद्र बांधणे कामी रक्कमेस रु. ५५ कोटी या रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४३४** **विषय क्रमांक – ४३४**

**दिनांक- २६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४३४ दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. पर्या/०८/कावि/७०/२०२३, दि.२५/०९/२०२३ अन्वये, मनपाचे चिंचवड भाटनगर येथील जुन्या मैलाशुध्दीकरण केंद्राचे नुतनीकरण करून क्षमता वाढविणे या नुतनीकरणाच्या कामात जुने आवश्यक नसणारे बांधकाम पाडणेची परवानगी देणेबाबत. |
| **ठराव क्र. ४३४ दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. पर्या/०८/कावि/७०/२०२३, दि.२५/०९/२०२३ |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

| | |
|---|---|
| | अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात ९ ठिकाणी १४ मैलाशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत आहे. त्यापैकी भाटनगर मैलाशुध्दीकरण केंद्राची क्षमता ३० द.ल.लि. आहे, परंतू सध्यस्थितीत सदर ठिकाणी ३५ ते ३६ द.ल.लि. मैलापाणी येत आहे. भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता, निर्माण होणा-या मैला पाण्याची आवश्यकता लक्षात घेता सदर ठिकाणी ४५ द.ल.लि. क्षमतेचे मैलाशुध्दीकरण केंद्र आवश्यक आहे. त्यास अनुसरून सदर ठिकाणी जुन्या मैलाशुध्दीकरण केंद्राचे नुतनीकरण करण्याचे काम काढण्यात आले असून कामाचा आदेश मे.घारपुरे इंजिनिरींग अँण्ड कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना दि.२७/१२/२०२२ रोजी देणेत आला आहे. सदर प्रकल्पाचे निश्चित केलेल्या Plant layout, Process Flow diagramme आणि Hydraulic Flow Diagramme ला Collage of Engineering Pune (COEP) Technological University च्या मार्फत तपासणी करून मान्यता घेण्यात आलेली आहे.<br><br>भाटनगर मैलाशुध्दीकरण केंद्राचे नुतनीकरण करण्याचे काम करीत असताना Layout नूसार ठिकाणी मैलाशुध्दीकरण केंद्राच्या काही Unit ची जागा बदलावी लागणार असल्याने व काही Unit ची क्षमता वाढविण्यासाठी जून्या Unit ला पाडणे आवश्यक आहे तसेच सध्यस्थितीत मनपाच्या सर्व मैलाशुध्दीकरण केंद्रावर निर्जंतूकीकरण करण्यासाठी Chlorine ऐवजी Chlorine dioxide (Clo2) चा वापर करणेत येत असल्याने सध्यस्थितीत असलेल्या Chlorinator room ची आवश्यकता नाही. सदर मंजूर नकाशानुसार भाटनगर मैलाशुध्दीकरणाच्या नुतनीकरणाच्या कामात आवश्यक नसणा-या व क्षमता वाढविण्यासाठी इतर Unit पाडणेच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि.२१/०९/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी Chlorinator room ची आवश्यकता नसल्याने तसेच क्षमता वाढविण्यासाठी इतर Unit पाडणे आवश्यक असल्याने सदरच्या विषयास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४३५** **विषय क्रमांक – ४३५**

**दिनांक- २६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४३५**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/१२७६/२०२३ दि.२६/९/२०२३ अन्वये, भक्ती शक्ती ते मुकाई चौक बीआरटी कॉरीडॉर विकसित करणेची उर्वरीत कामे करणेच्या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ४३५**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/१२७६/२०२३ दि.२६/९/२०२३ अन्वये, भक्ती शक्ती चौक निगडी ते मुकाई चौक हा पिंपरी चिंचवड शहरातील मुख्य रस्ता आहे. पिंपरी चिंचवड शहरातुन रावेत, किवळे, मामुर्डी व मावळ भागात व तसेच पुणे-मुंबई एक्सप्रेस- वे कडे जाणेसाठी जवळचा रस्ता आहे. सदर रस्ता मुख्यतः रावेत - किवळे या गावाच्या शिवेवरुन जातो. रस्त्याचे रेखांकनाचा वाद होता त्यामुळे रस्त्याची जागा मनपाकडे हस्तांतरास विलंब झाला. याबाबत नगररचना विभाग, स्थापत्य विभाग, भू संपादन अधिकारी यांच्या मा.आयुक्त यांचेकडे बैठका संपन्न झाल्या व तद्नंतर नगररचना विभागाने सर्व कार्यवाही करुन रस्त्याची जागा मनपाच्या ताब्यात घेणेची प्रक्रिया पुर्ण करुन रस्त्याची जागा ताब्यात घेतली आहे. तथापि या रस्त्याने जागेसंदर्भात काही दावे न्यायप्रविष्ठ आहेत.<br>या रस्त्याचे मुळ काम सन २०१४-१५ या वर्षी सुरु करणेत आले होते व वेळोवेळी मुदतवाढ घेऊन दि. ३१/३/२०२३ अखेर काम पुर्ण करणेत आले आहे. तसेच सदर रस्त्यावरील निसर्ग दर्शन सोसायटी येथे रेल्वे उड्डाण पुलाचे काम प्रगतिपथावर असून वर्ष अखेरी पर्यन्त सदर पूल वाहतुकीस खुला करण्याचे नियोजन आहे. सदर पूल वाहतुकीस खुला केल्यानंतर सदर भक्ति शक्ति चौक ते मुकाई चौक रस्त्या मार्गे मोठ्या प्रमाणात वाहतूक होणार आहे. त्यामुळे सदर काम करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने भक्ति शक्ति चौक ते मुकाई चौक रस्त्याचे उर्वरीत काम करणेचे अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे.<br>मा. महापालिका सभा ठराव क्र. ३०६ दि. २९/३/२०२३ अन्वये सदर कामाचा सन २०२३-२४ या वर्षात अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेत आलेला असुन अंदाजपत्रकातील पान क्र. ७४ अ.क्र. २९ विशेष योजना या लेखाशिर्षावर अंदाजपत्रकीय र.रु. १५,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. पंधरा कोटी फक्त) इतकी व र.रु.१०००/- एवढी तरतुद करणेत आलेली आहे. त्यास अनुसरुन सदरचे काम करणेकरीता अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. सदरचे अंदाजपत्रक महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम खात्याकडील सन २०२२-२३ च्या राज्यस्तरीय दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन त्याची अंदाजपत्रकीय रक्कम २२,५०,००,०००/- इतकी येत आहे. तरी सदर कामासाठी र.रु. २२,५०,००,०००/- सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. उपरोक्त कामासाठी होणा-या र.रु. २२,५०,००,०००/- च्या सुधारित प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-४३६** **विषय क्रमांक – ४३६**

**दिनांक- २६/०९/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-४३६**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्र.वैद्य/१४अ /कावि /७३१/२०२३ दिनांक २६/०९/२०२३ अन्वये, किवळे येथील होर्डिंग दुर्घटनेत जखमी रुग्णांना खाजगी रुग्णालयात दाखल झाल्यानंतरच्या वैद्यकीय उपचार बिला बाबत. |
| **ठराव क्र. ४३६**<br>**दिनांक-२६/०९/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्र.वैद्य/१४अ/कावि/७३१/२०२३ दिनांक २६/०९/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील दि.१७/०४/२०२३ रोजी किवळेतील कात्रज-देहुरोड सर्व्हिस रोडवरील पंक्चरच्या दुकानाच्या आडोशाला उभ्या असलेल्या आठ जणांच्या अंगावर होर्डिंग पडून भीषण अपघात झाला. यामध्ये ०५ जणांचा मृत्यु झाला व इतर ०३ जण जखमी झाले. त्यानुसार खालील रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेले होते. सदर रुग्णालयातील या रुग्णांच्या बिलाचा तपशील, मनपाच्या धन्वंतरी स्वास्थ दरपत्रकाप्रमाणे मंजूर बील रक्कम रुपये व CGHS दरपत्रकाप्रमाणे मंजूर रक्कम रुपये खालील प्रमाणे आहे. |

| अ.क्र. | रुग्णाचे नांव | हॉस्पीटलचे नांव | हॉस्पीटलकडील प्राप्त बिल रक्कम | मनपा योजना धन्वंतरी स्वास्थ दरपत्रकाप्रमाणे मंजूर बील रक्कम रुपये | CGHS दरपत्रकाप्रमाणे मंजूर रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.विशाल यादव | आदित्य बिर्ला मेमोरिअल हॉस्पीटल | १२,६१,५५४ | ७,३३,४९८ | ७,३९,६०७ |
| २ | श्री.विशाल यादव | ओजस मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, रावेत | ८३,३७६ | ४५,७८८ | २४,००९ |
| ३ | श्री.रेहमत अन्सारी | ग्लोबल हॉस्पीटल, रावेत | ७,८९४ | ३,२९० | ३,३६० |
| ४ | श्रीम.रिंकी राय | ग्लोबल हॉस्पीटल, रावेत | २,८९,६७९ | १,४७,३८२ | १,६४,३६५ |
| | **एकुण-** | | १६,४२,५०३ | ९,२९,९५८ | ९,३१,३४१ |

उपरोक्त नमूद केल्यानुसार किवळे येथील होर्डिंग दुर्घटनेत जखमी रुग्णांना खाजगी रुग्णालयात दाखल झाल्यानंतरच्या वैद्यकीय उपचार बिलाची मनपाच्या “**धन्वंतरी स्वास्थ योजना**” दरपत्रकानुसार विशेष बाब म्हणून देणेबाबत मा. आयुक्त सो यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार एकुण र.रु.९,२९,९५८ **(अक्षरी र.रु.नऊ लाख एकोणतीस हजार नऊशे अठ्ठावन्न फक्त) ऐवढा होणारा खर्च** महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील- “ **आपत्तीग्रस्त**

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

## मा.प्रशासक यांजकडील मा.महापालिका सभा विषयांबाबत निर्णय

| | |
|---|---|
| | **नागरीकांना अर्थसहाय्य"**या लेखाशिर्षकातून देणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.<br><br>सदर होर्डिंग दुर्घटनेत जखमी रुग्णांना खाजगी रुग्णालयात दाखल करुन सदरचा खर्च महानगरपालिके मार्फत करणे ही विशेष बाब असल्याने महानगरपालिकेच्या महासभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**